मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 4 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# ‘जुनी वस्तू, नवा उपयोग’ संकल्पनेला उत्तम प्रतिसाद

## दिवाळी काळात महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्राना नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पिंपरी | प्रतिनीधी**

‘जुनी वस्तू, नवा उपयोग’ या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देत पिंपरी चिंचवड महापालिकेने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू केलेल्या आर.आर.आर. (रिड्यूस रियुज, रिसायकल) केंद्रांनी यंदाची दिवाळी सामाजिक जबाबदारीची दिवाळी म्हणून उजळवली आहे.

आठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत एकूण ३२ प्रभागनिहाय सुरू असलेल्या आर.आर.आर. केंद्रांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, वापरात नसलेल्या पण सुस्थितीत असलेल्या वस्तू मोठ्या प्रमाणात दान केल्या गेल्या आहेत.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने नागरिकांना जुने कपडे, खेळणी, भांडी, पुस्तकं, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांसारख्या वस्तू केंद्रात जमा करण्याचे आवाहन केले होते. नागरिकांनीही हे आवाहन मनापासून स्वीकारत दानात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या वस्तूंचे वर्गीकरण करून त्या गरजू कुटुंबांना वितरित केल्या जात आहेत, ज्यामुळे त्यांच्या घरातही आनंदाचा दिवा प्रज्वलित झाला आहे.




या उपक्रमाला अधिक गती देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून जनजागृती बरोबरच विविध सोसायट्यांमध्ये घरोघरी जाऊन विशेष वस्तू संकलन मोहीम राबविण्यात आली होती. त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. महापालिकेच्या सर्व आर.आर.आर. केंद्रांवर मिळून तब्बल ३१ टन पुनर्वापरा योग्य वस्तू जमा झाल्या आहेत. या माध्यमातून ‘पुनर्वापरातून पर्यावरण संवर्धन’ या संकल्पनेला नागरिकांच्या सहकार्याने बळ मिळाले आहे.

> आर.आर.आर. केंद्रांच्या माध्यमातून या उपक्रमात नागरिक घेत असलेला उत्स्फूर्त सहभाग, हेच या उपक्रमाचे खरे यश आहे. दिवाळीच्या काळात लोकांनी स्वतःचा आनंद इतरांशी वाटून सामाजिक जबाबदारीचे सुंदर उदाहरण निर्माण केले आहे. ‘जुनी वस्तू, नवा उपयोग’ या संकल्पनेतून नागरिकांनी पर्यावरण संवर्धन आणि माणुसकी या दोन्ही मूल्यांची जपणूक केली आहे.
>
> – विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आर.आर आर. उपक्रमासाठी विशेष जनजागृती मोहिम राबवण्यात येत असून, “स्वच्छता, पुनर्वापर आणि पर्यावरण संवर्धन” या तिन्ही मूल्यांचा संगम साधणाऱ्या या अभियानात नागरिकांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### येथे आहे आर.आर.आर. सेंटर..

- “अ” क्षेत्रीय कार्यालय : कापसे उद्यान, मोरवाडी (प्र. १०), आकुर्डी भाजी मंडई (प्र. १४), संत तुकाराम महाराज गार्डन (प्र. १५), श्रीधरनगर गार्डन (प्र. १९)
- “ब” क्षेत्रीय कार्यालय : एसकेएफ कंपनी शेजारी, थेरगाव (प्र. १७), हेगडेवार पूल, दर्शननगरी (प्र. १८), धर्मराज चौक, रावेत (प्र. १६), ज्योतिबा उद्यान, काळेवाडी (प्र. २२)
- “क” क्षेत्रीय कार्यालय : हेगडेवार क्रीडा संकुल, अजमेरा (प्र. ९), धावडे वस्ती, भोसरी (प्र. ६), संत सावता महाराज उद्यान, मोशी (प्र. २), संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणी नगर
- “ड” क्षेत्रीय कार्यालय :लिनियर गार्डन, कोकणे चौक (प्र. २८), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, पिंपळे निलख (प्र. २६), तानाजी कलाटे उद्यान, वाकड (प्र. २५), प्रभाग कार्यालय क्र. २९
- “इ” क्षेत्रीय कार्यालय : मोशी चौक (प्र. ३), दिघी जकात नाका (प्र. ४), राजमाता जिजाऊ उड्डाण पूल, भोसरी (प्र. ५, ७)
- “फ” क्षेत्रीय कार्यालय : वृंदावन, चिखली (प्र. १), भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (प्र. ११), रूपीनगर पोलिस चौकी (प्र. १२), शनि मंदिर, सेक्टर २१ (प्र. १३)
- “ग” क्षेत्रीय कार्यालय : थेरगाव हॉस्पिटल शेजारी, जगताप नगर (प्र. २३), मोरू बारणे उद्यान, थेरगाव (प्र. २४), पिंपरीगाव बसस्टॉप (प्र. २१), आरोग्य कोठी, रहाटणी गावठाण (प्र. २७)
- “ह” क्षेत्रीय कार्यालय : छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर (प्र. २०), सितांगण गार्डन (प्र. ३०), कै. काळुराम जगताप तलाव (प्र. ३१), जुनी सांगवी भाजी मंडई (प्र. ३२).

---

# पिंपरी न्यायालयातील वकिलांनी लाल फिती लावून केले कामकाज

## वकिल संरक्षण कायदा तातडीने लागू करण्याची मागणी; प्रतीकात्मक आंदोलनातून नाराजी व्यक्त

**पिंपरी | प्रतिनीधी**

राज्यात वकिलांवरील वाढत्या हल्ल्यांच्या निषेधार्थ आणि वकील संरक्षण कायदा तातडीने लागू करण्याच्या मागणीसाठी राज्यातील सर्व न्यायालयीन वकिलांनी काम बंद आंदोलनाचा निर्णय महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेमागे घेतला आहे. मात्र सोमवारी (ता. ३) येथील पिंपरी न्यायालयातील वकीलांनी लाल फीत लावून न्यायालयातील कामकाज केले.



वकील संरक्षण कायद्याचा मसुदा ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे सुपूर्द केला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे वकिलांनी काम बंद न करता लाल फिती घालून कामकाज केले. यावेळी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोशशनचे माजी अध्यक्ष ॲड. सुदाम साने , ॲड. सुनिल माने ॲड. अतुल कांबळे,ॲड.अजिक्य मराठे, ॲड. गणेश राऊत ,ॲड. दिपक साबळे ,ॲड. दिपक गायकवाड, आदी वकिल उपस्थित होते.

# कुदळवाडी चिखली परिसरातील नागरिकांसाठी मोफत महाआरोग्य शिबिर

## भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

जनता पक्ष युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर व शासकीय योजना आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चिखली कुदळवाडी परिसरातील नागरिकांना या शिबिराचा मोठा लाभ घेता येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे. यावेळी नागरिकांना विविध आजारांची मोफत तपासणी व औषधोपचार या ठिकाणी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

शिबिरामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, मुळव्याध शस्त्रक्रिया, नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी, फिजिओथेरपी, चामखीळ, मोस, मस्सा काढणे, तात्काळ वेदना शमन चिकित्सा यांसह अनेक उपचार मोफत स्वरूपात केले जाणार आहेत. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत तपासणी व सल्ला मार्गदर्शन, मोफत लसीकरण (बालकांसाठी) आदी सुविधा देखील उपलब्ध असतील.




**येथे घ्या शिबिराचा लाभ..**

श्री. तात्यासाहेब सपकाळ क्रिडांगण, आण्णासाहेब बँक समोर, कुदळवाडी, चिखली येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणावा, असे आयोजकांनी कळवले आहे. अधिक माहितीसाठी ९७६३९००७७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शासकीय योजनांची माहिती आणि मार्गदर्शन..

» याशिवाय शिबिरात नागरिकांना विविध शासकीय योजनांची नोंदणी व मार्गदर्शन मिळणार आहे. यात वयोवंदना कार्ड, माझी लाडकी बहीण योजना KYC, सुकन्या समृद्धी योजना, आयुष्यमान भारत कार्ड, ई-श्रम कार्ड, आभा कार्ड, घरगुती कामगार कल्याण योजना, क्रांतीज्योती बाल संगोपन योजना अशा अनेक योजनांचा समावेश आहे.

### येथे घ्या शिबिराचा लाभ..

» श्री. तात्यासाहेब सपकाळ क्रिडांगण, आण्णासाहेब बँक समोर, कुदळवाडी, चिखली येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिराचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आधार लिंक असलेला मोबाईल नंबर सोबत आणावा, असे आयोजकांनी कळवले आहे. अधिक माहितीसाठी ९७६३९००७७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> या शिबिराचा उद्देश म्हणजे समाजातील सर्व घटकांपर्यंत आरोग्य व शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणे हा आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना प्राथमिक उपचार घराजवळ मिळतील. तसेच शासकीय योजनांची देखील माहिती मिळेल. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा.
>
> – दिनेश लालचंद यादव, अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर.

# चिखली पाटीलनगर रस्त्याचे काम रेंगाळले; नागरिक त्रस्त

## पाटीलनगर परिसरात मागील एक वर्षापासून रस्त्याचे कामकाज सुरु; ये-जा करण्यास मोठी अडचण

**पिंपरी | प्रतिनीधी**

पाटीलनगर परिसरात मागील काही महिन्यांपासून रस्त्याचे कामकाज सुरु आहे. मात्र रेंगाळलेल्या कामामुळे परिसरातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. महापालिका प्रशासनाकडून मागील वर्षभरापासून रस्त्याचे काम रेंगाळल्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पाटीलनगर परिसरात मागील एक वर्षापासून रस्त्याचे कामकाज सुरु आहे. तसेच पाटीलनगर रस्त्याचे रुंदीकरण रखडलेले आहे. वर्षभरापासून रेंगाळलेल्या कामामुळे नागरिकांना ये-जा करण्यास अडचणी, गाड्या स्लीप होणे, बाजूला नागेश्वर विद्यालय, संतपीठ स्कूल, ॲकडमी हाईट्स स्कूल असे तीन शैक्षणिक संकूल असल्याने विद्यार्थ्यांना पालकांना ये-जा करण्यास मोठी अडचण येते. पालकांना वळसा घालून यावे लागते. चिखली परिसरात अनेक गृहप्रकल्प आहेत, लोकसंख्या वाढली असून, त्या लोकांना ये-जा करताना अनेक अडचणी येतात. धूळीचा त्रास अबालवृध्दांना सहन करावा लागतो. रेंगाळलेल्या रस्त्याच्या कामामुळे पाण्याच्या लाईन तुटने, केबल तुटने, विद्युत पुरवठा खंडीत होणे अशा अनेक अडचणीचा सामना नागरिकांना करावा लागतो आहे.



> चिखली पाटीलनगरच्या शेवटच्या टोकाला जायचे म्हटल्यास पाटीलनगरचा मुख्य रस्त्याचा वापर केला जातो. मात्र रस्त्याचे रूंदीकरण रखडल्याने आणि पुढे सुरु असलेले रस्त्याचे काम रेंगाळल्याने नागरिकांना ये-जा करण्यास, धूळीचा त्रास, केबल तुटल्यानंतरचा त्रास सहन करावा लागतो. महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागतो आहे. त्यामुळे रेंगाळलेले काम त्वरीत मार्गी लावावे.
>
> - जितेंद्र यादव, स्थानिक.

> पाटीलनगरमधील नागरिकांना रेंगाळलेल्या रस्त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. यासाठी महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडे रस्त्याचे काम तत्काळ पूर्णत्वास नेण्यासाठी वारंवार पाठपुरावा केला आहे. पावसाचे कारणे देऊन उडवा-उडवीची उत्तरे आम्ही खपवून घेणार नाही.
>
> - अंकुश मळेकर, स्थानिक.

> पावसामुळे रस्त्याचे काम रेंगाळले आहे. रस्त्याचे काम लवकरात-लवकर व्यवस्थित व्हावे यासाठी प्रयत्न सुरु आहे. पावसामुळे रस्त्यासाठी आवश्यक असणारे अवजड वाहने, डांबरीकरण प्लांट बंद आहेत.
>
> - शिवाजी चौरे, फ प्रभाग स्थापत्य विभाग.

# पुणे रेल्वे स्थानकावरही वॉर रूम

## रेल्वे प्रवासात सुलभता आणण्यासाठी स्थानकावर प्रथमच 'वॉर रूम'ची स्थापना करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील सर्वाधिक गर्दी असणाऱ्या १७ रेल्वे स्थानकांमध्ये पुणे रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने गर्दीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या, अडचणींवर मात करून रेल्वे प्रवासात सुलभता आणण्यासाठी स्थानकावर प्रथमच 'वॉर रूम'ची स्थापना करण्यात आली आहे. प्रामुख्याने प्रवाशांनी केलेल्या तक्रारींचे अवघ्या वीस मिनिटांमध्ये निराकरण करून प्रतिसाद देण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना करण्यात आल्याने प्रवासात सुलभता येत असून, गर्दीवर नियंत्रण ठेवणे सोपे होत आहे.

'गेल्या काही वर्षांत भारतीय रेल्वेतील आधुनिकीकरणामुळे रेल्वे प्रवासाला आणखी मागणी वाढत आहे, त्यामुळे स्थानकांच्या मर्यादित क्षमतेमुळे गर्दी वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतीय रेल्वेने प्रशासनाने सर्वाधिक गर्दी होणाऱ्या स्थानकांची तपासणी केली. यामध्ये पुणे रेल्वे स्थानकाचा समावेश असून, स्थानकावरून दिवसभरातून दैनंदिन सुमारे दीड लाख प्रवासी प्रवास करतात. सण-उत्सवांच्या काळात प्रवाशांची संख्या आणखी वाढते. त्यामुळे गर्दीच्या काळात जादा, विशेष सोडलेल्या गाड्यांचे नियोजन किंवा नियोजित गाड्या वेळापत्रकानुसार सोडताना अडचणी येतात. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून भारतीय रेल्वेच्या मार्गदर्शनानुसार स्थानकावर वॉर रूम स्थापन करण्यात आले आहे,' अशी माहिती मध्य रेल्वे पुणे विभागाचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पद्मसिंह जाधव यांनी दिली.

'प्रवाशांच्या प्रामुख्याने गाडीतील NON-A फॅन बंद आहे, अस्वच्छता, बेडरोल खराब, स्वच्छतागृहात पाणी नाही, विद्युत उपकरणात बिघाड, मोबाईल चार्जर समस्या, गाडी विलंब, सहप्रवाशाचे गैरवर्तन, फलाटांची सूचना, आदी तक्रारींचा समावेश आहे. 'वॉर रूममुळे गर्दीचे नियमन करणे शक्य होत असून, वेळेवर फलटावर येणारी गाडी येण्यापूर्वीच प्रवाशांचा सूचना दिल्या जात आहेत. तसेच, ज्या ठिकाणी गाडीला गर्दी आहे, त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ, सुरक्षा बलाचे जवान तैनात करून त्यांच्याद्वारे गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. एखाद्या प्रवाशाच्या साहित्याची पिशवी किंवा कोणी हरवल्यास थेट 'वॉर रूम'मध्ये तक्रार करता येत आहे किंवा फलाटावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे तक्रार करताच त्याची माहिती 'वॉर रूम'मध्ये देऊन त्याची वीस मिनिटांच्या आत निपटारा केला जात आहे.




### वीस मिनिटांच्या आत निपटारा

» जाधव म्हणाले, 'वॉर रूममुळे गर्दीचे नियमन करणे शक्य होत असून, वेळेवर फलटावर येणारी गाडी येण्यापूर्वीच प्रवाशांचा सूचना दिल्या जात आहेत. तसेच, ज्या ठिकाणी गाडीला गर्दी आहे, त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ, सुरक्षा बलाचे जवान तैनात करून त्यांच्याद्वारे गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. एखाद्या प्रवाशाच्या साहित्याची पिशवी किंवा कोणी हरवल्यास थेट 'वॉर रूम'मध्ये तक्रार करता येत आहे किंवा फलाटावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे तक्रार करताच त्याची माहिती 'वॉर रूम'मध्ये देऊन त्याची वीस मिनिटांच्या आत निपटारा केला जात आहे.

### कसे आहे वॉर रूम ?

- » स्थानकात डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश असलेली रूम
- » वॉर रूममध्ये २४ तास १० कर्मचाऱ्यांची नेमणूक
- » तक्रार प्राप्त होताच गाडीतील किंवा स्थानकावरील संबंधित कर्मचाऱ्याशी संपर्क
- » प्राप्त तक्रारीचा २० मिनिटांमध्ये निपटारा करण्याची मुदत

### 'रेल मदत'

» 'प्रवाशांच्या प्रामुख्याने गाडीतील non-a फॅन बंद आहे, अस्वच्छता, बेडरोल खराब, स्वच्छतागृहात पाणी नाही, विद्युत उपकरणात बिघाड, मोबाईल चार्जर समस्या, गाडी विलंब, सहप्रवाशाचे गैरवर्तन, फलाटांची सूचना, आदी तक्रारींचा समावेश आहे. संबंधित तक्रारी 'रेल मदत' किंवा रेल्वेचे 'एक्स'वरील हँडलवर सर्वाधिक प्रमाणात केल्या जात आहेत,' असे जाधव यांनी नमूद केले.

# पुणे पदवीधरसाठी महायुतीची जोरदार तयारी

## भाजप नेते चंद्रकांत पाटलांनी उमेदवाराची केली घोषणा, चंद्रकांत पाटलांनी शरद लाड यांचं नाव घोषित केलं.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याचे मंत्री आणि भाजप नेते चंद्रकांत पाटलांनी पुणे पदवीधरसाठी महायुतीचा उमेदवार जाहीर केला. चंद्रकांत पाटलांनी शरद लाड यांचं नाव घोषित केलं. शरद लाड हे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे पदवीधरचे आमदार अरुण लाडयांचे पुत्र आहेत. त्यांनी गेल्याच महिन्यात भाजपमध्ये प्रवेश केला होता.

भाजपने शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार अरुण लाड यांचे चिरंजीव शरद लाड यांना पक्षात घेऊन उमेदवारीचा शब्द दिला होता. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांनीच शरद लाड यांच्या उमेदवारीची एकप्रकारे घोषणा केली. सांगली जिल्ह्यातील पलूस येथे आयोजित भाजप कार्यालय आणि पक्षप्रवेशाच्या मेळाव्यात ते बोलत होते.

विद्यमान आमदार अरुण लाड हे माजी मंत्री जयंत पाटील यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे त्यांना धक्का देण्यासाठी भाजपने शरद लाड यांना पक्षात घेतलं. त्यानंतर आता चंद्रकांत पाटलांनी त्यांच्या नावाची घोषणासुद्धा केली. पुणे पदवीधर मतदारसंघासाठी भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी दावा केला आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून या आधी कागलच्या प्रताप उर्फ भैय्या माने यांच्या नावाची घोषणा मंत्री हसन मुश्रीफ यांनी केली होती. त्यामुळे या जागेवरुन भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### दोन्ही पक्षांचा दावा

» विद्यमान आमदार अरुण लाड हे माजी मंत्री जयंत पाटील यांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे त्यांना धक्का देण्यासाठी भाजपने शरद लाड यांना पक्षात घेतलं. त्यानंतर आता चंद्रकांत पाटलांनी त्यांच्या नावाची घोषणासुद्धा केली. पुणे पदवीधर मतदारसंघासाठी भाजप आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांनी दावा केला आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघामध्ये सध्या राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अरुण लाड प्रतिनिधीत्व करतात. पुढील वर्षी होणाऱ्या या निवडणुकीसाठी रस्सीखेच सुरू झाल्याचं दिसून येतंय. कोणत्याही परिस्थितीत ही जागा निवडून आणायची असा चंग भाजपने बांधल्याचं दिसतंय. त्यामुळेच गेल्या काही दिवसांपासून पदवीधर मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात नाव नोंदणी सुरू आहे. तर ही जागा आपल्याकडेच राखण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते सरसावले आहेत. पुणे पदवीधर मतदारसंघात एकीकडे भाजपचे नेटवर्क आहे. तर दुसरीकडे काँग्रेसचे नेते सतेज पाटील आणि विश्वजित कदम यांचेही नेटवर्क मोठं आहे.

# जिल्हा परिषदेत फक्त अजित पवारांचीच सत्ता!

## राष्ट्रवादीच्या मेळाव्यातून कार्यकर्त्यांना स्पष्ट संदेश, मुंबईत ठरणार रणनीती

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेमध्ये अजित पवारांची एकहाती सत्ता असली पाहिजे. मित्रपक्ष बरोबर असले तरी आपला पक्ष एक नंबर आला पाहिजे. भारतीय जनता पार्टी जर 'शत प्रतिशत' चा नारा देत असेल, तर तो राष्ट्रवादी पक्षाला म्हणण्याचा अधिकार आहे. प्रत्येक पक्ष आपली संघटना वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. राष्ट्रवादीला आपला पक्ष वाढवायचा असून त्यासोबत नेत्याची ताकद वाढवायची आहे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी केले.

नारायणगाव येथे झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते. यावेळी माजी आमदार अतुल बेनके, जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष गणपत फुलावडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अँड. संजय काळे, पुणे जिल्हा कात्रज दूध संघाचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान संचालक बाळासाहेब खिलारी, विद्यमान संचालक भाऊसाहेब देवाडे, पापा खोत, उज्वला शेवाळे, सुप्रिया लेंडे वैष्णवी चतुर, अक्षदा मांडे, पुष्पा गोसावी, शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

मित्रपक्ष बरोबर असले तरी आपला पक्ष एक नंबर आला पाहिजे. भारतीय जनता पार्टी जर 'शत प्रतिशत' चा नारा देत असेल, तर तो राष्ट्रवादी पक्षाला म्हणण्याचा अधिकार आहे. भविष्यात अजितदादा मुख्यमंत्री होणार नाही, असे छातीठोकपणे कोणी सांगू शकतो का? कारण राजकारणाची दोलायमान स्थिती आहे. म्हणूनच ग्रामपंचायतपासून लोकसभेपर्यंत आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येणे आवश्यक आहे. व्यक्तिगत स्वार्थापेक्षा, पक्ष व नेता श्रेष्ठ आहे. कार्यकर्ता समंजस व शिस्तीचा असला पाहिजे, उमेदवारी मिळाली नाही तरी त्याने पक्षनिष्ठा सोडता कामा नये. बंडखोरी होता कामा नये. सत्तेपेक्षा संघटनेची ताकद सर्वाधिक असते. कारण संघटना गोरगरिबांना न्याय देऊ शकते, तेवढा न्याय प्रशासन देऊ शकत नाही.



### कार्यकर्त्यांना जबाबदारी द्यावी..

» पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत यासारख्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुक ज्या इच्छुक उमेदवारांना लढवायच्या असतील त्यांनी तातडीने फॉर्म भरून द्यावेत. पक्षांमध्ये लोकशाही असली पाहिजे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत प्रभागामध्ये पक्षाला मानणारे जे पदाधिकारी, कार्यकर्ते निवडणुक लढविण्यास इच्छुक नाहीत त्यांच्यावर जिल्हा परिषद गट व गणाची जबाबदारी द्यावी.

### मुंबईला बैठक..

» अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली 7 नोव्हेंबरला मुंबई येथे मार्गदर्शन करण्यासाठी पक्षाच्या पंधरा निवडक नेत्यांची, कार्यकर्त्यांची जिल्हा व तालुका निहाय विचार सभा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे उपस्थित असणार आहे. यावेळी चर्चेत उपस्थितांनी निवडणुकी संदर्भात स्पष्ट विचार मांडून नेत्यांचा होकार घ्यायचा आहे. त्यानंतरच आपल्या तालुक्यात सोयीचे राजकारण करावयाचे आहे.

### राजकारणाची दोलायमान स्थिती

» भविष्यात अजितदादा मुख्यमंत्री होणार नाही, असे छातीठोकपणे कोणी सांगू शकतो का? कारण राजकारणाची दोलायमान स्थिती आहे. म्हणूनच ग्रामपंचायतपासून लोकसभेपर्यंत आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येणे आवश्यक आहे. व्यक्तिगत स्वार्थापेक्षा, पक्ष व नेता श्रेष्ठ आहे. कार्यकर्ता समंजस व शिस्तीचा असला पाहिजे, उमेदवारी मिळाली नाही तरी त्याने पक्षनिष्ठा सोडता कामा नये. बंडखोरी होता कामा नये. सत्तेपेक्षा संघटनेची ताकद सर्वाधिक असते. कारण संघटना गोरगरिबांना न्याय देऊ शकते, तेवढा न्याय प्रशासन देऊ शकत नाही.

# पिंपरखेड पुन्हा हादरले! भरदुपारी बिबट्याच्या हल्ल्यात 13 वर्षीय रोहनचा मृत्यू

## मृतदेह ताब्यात देण्यास ग्रामस्थांचा नकार, संतप्त ग्रामस्थांचा वनविभागाविरोधात संताप - वाहन पेटवले, ठोस कारवाईची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे पुन्हा एकदा बिबट्याच्या हल्ल्याची भीषण घटना घडली आहे. भरदिवसा ऊसाच्या शेताजवळ खेळत असलेल्या रोहन विलास बोंबे (वय 13) या मुलावर बिबट्याने झडप घालत त्याला शेतात ओढून नेले. या हल्ल्यात रोहनचा जागेवरच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने पिंपरखेड परिसरात भीती आणि संतापाचं वातावरण निर्माण झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी सुमारे पावणेचारच्या सुमारास रोहन हा घरासमोरच्या शेताजवळ खेळत होता.

दरम्यान, ऊसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्याच्यावर हल्ला केला आणि ओढून नेले. मुलगा दिसत नसल्याचे लक्षात येताच कुटुंबीय आणि शेजारी शोध घेऊ लागले. तरुणांनी आरडाओरड करत ऊसाच्या शेतात प्रवेश केला असता, काही अंतरावर रोहनचा मृतदेह आढळून आला. दोन वेळा रास्तारोको आंदोलन करूनही वनविभाग झोपेत, आज अखेर ग्रामस्थांनी वाहन पेटवून संताप व्यक्त केला. ठोस कारवाई व सुरक्षिततेचे आश्वासन मिळाल्याशिवाय रोहनचे शवविच्छेदन होऊ देणार नाही, असा पवित्रा पिंपरखेड ग्रामस्थांनी घेतला आहे.

या हल्ल्यात रोहनचा जागेवरच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने पिंपरखेड परिसरात भीती आणि संतापाचं वातावरण निर्माण झालं आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाच्या निष्क्रियतेविरोधात संताप व्यक्त केला. घटनास्थळी दाखल झालेल्या वनविभागाच्या वाहनाची तोडफोड करून ते वाहन पेटवून दिले. ग्रामस्थांचा आरोप आहे की, मागील वीस दिवसांत या परिसरात बिबट्यांच्या हल्ल्याच्या तीन घटना घडल्या असून, तरीही विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. ग्रामस्थांचा रोष एवढा वाढला की, त्यांनी ठोस निर्णय घेतल्याशिवाय शवविच्छेदन होणार नाही असा इशारा दिला. संपूर्ण परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असून, पोलिस व प्रशासनाकडून ग्रामस्थांना शांत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



### तीन आठवड्यांत तिसरी घटना..

» मागील काही दिवसांपासून पिंपरखेड परिसरात बिबट्यांचे वावर वाढल्याची भीती नागरिकांमध्ये आहे. गेल्या वीस दिवसांत झालेल्या या तिसऱ्या घटनेने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. दोन वेळा रास्तारोको करूनही वनविभाग आणि शासन संवेदनाहीन राहिल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.